आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२४ मे २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यानंतर मतदानाचा अधिकृत आकडा निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याचे निर्देश द्यायला सर्वोच्च न्यायालयाचा नकार
- लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यात उद्या ५८ मतदारसंघांमध्ये मतदान
- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या चार जागांच्या निवडणुकीसाठी नव्यानं कार्यक्रम जाहीर,  येत्या २६ जूनला मतदान
- डोंबिवली एमआयडीसी स्फोट प्रकरणी आरोपी मालती मेहताला नाशिकमधे अटक / स्फोटातल्या मृतांची संख्या १३ वर

  **आणि**
- तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात भारताची ज्योती सुरेखा वेन्नम आणि प्रियांश ही जोडी मिश्र सांघिक स्पर्धेच्या अंतिम फेरीत दाखल

**<><><><><>**

सध्या सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यात झालेल्या मतदानाचा अधिकृत आकडा प्रत्येक टप्प्यानंतर निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याचे निर्देश आयोगाला द्यायला सर्वोच्च न्यायालयानं आज नकार दिला. निवडणुकीच्या या टप्प्यावर असे निर्देश देणं योग्य ठरणार नाही, असं मत न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती एस. सी. शर्मा यांच्या खंडपीठानं मांडलं. निवडणुका संपत आलेल्या असताना या प्रक्रियेत

कोणताही बदल केला तर अडचणी आणि संभ्रम निर्माण होईल, असं आयोगानं आपल्या प्रतिज्ञापत्रात म्हटलं होतं.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यात उद्या ५८ मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे. यात उत्तर प्रदेशातल्या १४, हरियाणातल्या १०, बिहार आणि पश्चिम बंगालमधल्या प्रत्येकी ८, दिल्लीतल्या ७, ओडिशातल्या ६, झारखंडमधल्या ४ आणि जम्मू-काश्मीरमधल्या एका जागेचा समावेश आहे. ओडिशा विधानसभेच्या ४२ जागांसाठीचं मतदानही उद्या होईल. सकाळी ७ वाजल्यापासून मतदानाची प्रक्रिया सुरू होणार आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते धर्मेंद्र प्रधान, मनेका गांधी, मनोहर लाल खट्टर, संबित पात्रा, बांसुरी स्वराज आणि मनोज तिवारी, काँग्रेसचे दीपेंदर सिंह हूडा, कुमारी शैलजा, राज बब्बर आणि कन्हैय्या कुमार, समाजवादी पक्षाचे नेते धर्मेंद्र यादव आणि पीपल्स डेमॉक्रॅटिक पक्षाच्या प्रमुख मेहबूबा मुफ्ती यांच्यासह इतर दिग्गजांचं भविष्य उद्या मतदान यंत्रात बंद होईल.

लोकसभा निवडणुकीच्या या सहाव्या टप्प्यात ११ कोटींपेक्षा जास्त पात्र मतदार आहेत. एक लाखापेक्षा जास्त मतदान केंद्रांमध्ये ११ लाखांपेक्षा जास्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदानाची प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी निवडणूक आयोगानं सर्व तयारी पूर्ण केली आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं गेल्या १० वर्षांमध्ये सीमावर्ती आणि डोंगराळ राज्यांमध्ये वेगानं विकास केल्याचं, तसंच या भागात रस्त्यांचं मोठं जाळं निर्माण केल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते आज शिमला मतदारसंघात

नहन इथल्या प्रचारसभेत बोलत होते. या दशकात देशाचं लष्कर अधिक शक्तिशाली झालं असून, शत्रूंच्या भूमीवर जाऊन त्यांच्यावर हल्ला करण्याची क्षमता लष्करात असल्याचं त्यांनी सांगितलं. काँग्रेसला आरक्षित प्रवर्गांसाठीचं आरक्षण काढून टाकून धर्माधारित आरक्षण आणायचं आहे, असा आरोप त्यांनी केला. काँग्रेसचा हा उद्देश भाजपा कधीच सफल होऊ देणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. त्यानंतर भाजपाच्या मंडी इथल्या उमेदवार कंगना रनौत यांच्या समर्थनार्थही मोदी यांनी सभा घेतली.

काँग्रेस पक्ष पाकिस्तानची भाषा बोलत असल्याचा आरोप मोदी यांनी पंजाबच्या गुरदासपूर जिल्ह्यातल्या दिनानगर इथं बोलताना केला. काँग्रेसला जम्मू-काश्मीरमध्ये कलम ३७० पुन्हा लागू करायचं आहे आणि तिथं दहशतवादाला खतपाणी घालायचं आहे. त्यामुळे इंडिया आघाडी हा देशाच्या सुरक्षेला मोठा धोका आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी शिबू सोरेन यांच्या सून सीता सोरेन यांच्यावर अन्याय केला, पण आपला पक्ष त्यांना न्याय मिळवून देईल, असं आश्वासन केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी आज जामतारा इथल्या प्रचारसभेत दिलं. भाजपाने सीता सोरेन यांना दुमका मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातल्या केंद्र सरकारनं राज्यातल्या गिरिदीह आणि बुधा पहाड यासारख्या प्रदेशांमधून नक्षलवाद हद्दपार केला, असं शहा म्हणाले.

**<><><><><>**

बहुजन समाज पक्षाच्या अध्यक्ष मायावती यांनी आज पंजाबमधे नवनशहर इथं आपल्या उमेदवाराच्या प्रचारार्थ सभा घेतली. देशातला शेतकरी आज काळजीत आणि अडचणीत असल्याचं सांगून त्यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी केंद्रीय यंत्रणांचं खासगीकरण करत आहेत, हे लोकशाहीविरोधी आहे, असा आरोपही मायावती यांनी केला.

**<><><><>**

राज्यात मुंबई तसंच कोकण विभाग पदवीधर मतदारसंघ आणि नाशिक विभाग तसंच मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा विधानपरिषदेच्या चार जागांसाठी येत्या २६ जूनला मतदान होणार आहे. भारत निवडणूक आयोगानं आज या निवडणुकीसाठी नव्यानं कार्यक्रम जाहीर केला.

या निवडणुकीसाठी येत्या ३१ तारखेला अधिसूचना जारी होईल, त्यानंतर ७ जूनपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येतील. अर्जांची छाननी १० जूनला होणार असून, १२ जून ही अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. या चारही मतदारसंघांसाठी २६ जूनला सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार आहे, तर मतमोजणी १ जुलैला होईल.

**<><><><>**

डोंबिवली एमआयडीसी स्फोट प्रकरणातल्या आरोपी मालती मेहताला आज नाशिक पोलिसांनी पेठरोड इथं अटक केली. दुर्घटनेनंतर त्यांनी नाशिकमध्ये आपल्या एका नातेवाईकाच्या घरी आश्रय घेतला होता. ठाणे गुन्हे शाखेनं मोबाईल लोकेशनवरून त्यांचा शोध घेतला. दरम्यान डोंबिवली इथल्या औद्योगिक वसाहतीतल्या कंपनीत काल झालेल्या स्फोटातल्या म-तांची संख्या १३ झाली आहे. मालती मेहता, या कंपनीच्या मालक आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या कुटुंबाला पाच लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर केलं आहे. जखमींच्या उपचाराचा खर्च राज्यसरकार उचलणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

दक्षिण कोरियात येचिओन इथं सुरु असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात भारताच्या ज्योती सुरेखा वेन्नम आणि प्रियांश या जोडीनं मिश्र सांघिक स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य फेरीत या संघानं यजमान देशाच्या हान सेन गियोन आणि यांग जावॉन या जोडीचा पराभव केला.

या विजयाबरोबर भारतानं या स्पर्धेत आपलं दुसरं पदक निश्चित केलं आहे. ज्योती आणि प्रियांश या जोडीचा उद्या अमेरिकेच्या ऑलिव्हिया डीन आणि सॉयर सुलिव्हन या जोडीशी सामना होणार आहे. प्रथमेश फुगेनं देखील स्पर्धेच्या वैयक्तिक गटात उपांत्य फेरी गाठली आहे.

**<><><><><>**

भारतीय बॅडमिंटन पटू आणि दोनवेळा ऑलंपिक पदक विजेती पी. व्ही. सिंधुनं मलेशियन मास्टर्स च्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. आज सकाळी क्वालालंपूर इथं आज सकाळी झालेल्या सामन्यात तिनं चीनच्या हान हुई चा २१-१३,१४-२१,२१-२२ असा पराभव केला.

महिला एकेरीच्या दुसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात मात्र भारताच्या अश्मिता चलिहा हिला चीनच्या झांग यी मान हिच्याकडून १०-२१, १५-२१ असा पराभव पत्करावा लागला.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत अंतिम फेरीत प्रवेशासाठी पात्रता फेरीतला दुसरा सामना चेन्नईच्या एम. ए चिंदबरम स्टेडियमवर, सनराईजर्स हैद्राबाद आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सुरु आहे. राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा सनराईजर्स हैद्राबादच्या ८ षटकात ३ बाद ९२ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेलं चक्रीवादळ, तीव्र चक्रीवादळात परावर्तीत होऊन  येत्या २६ मे रोजी पश्चिम बंगाल आणि बांगलादेशच्या किनारपट्टीला धडकेल अशी शक्यता भारतीय हवामान शास्त्र विभागानं वर्तवली आहे. यावेळी चक्रीवादळाचा वेग ताशी ११० ते १२० किलोमीटर असू शकेल, तर धडक दिल्यानंतर २४ तासांनी चक्रीवादाळाची तीव्रता कमी होईल असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

या चक्रीवादाळामुळे हवामान विभागानं कोलकाता, हावडा, नादिया, झारग्राम, उत्तर २४ परगणा, दक्षिण २४ परगणा आणि पूर्व मेदिनीपूर जिल्ह्यांमधे हलक्या ते मध्यम पाऊस पडेल असा अंदाज विभागानं व्यक्त केला असून, ऑरेंज अलर्टही जारी केला आहे.

**<><><><><>**

पंजाब, हरियाणा, राजस्थान, गुजरात आणि पश्चिम मध्यप्रदेशमध्ये पुढले ५ दिवस अती तीव्र उष्णतेची लाट राहील असा अंदाज आहे.